DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते



## सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | नथुराम तातु बांदल |
| वय | – | ६२ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| मुळ राहणार | – | रा. आकले कोंड, पो. सवाद, ता. महाड, जि. रायगड. |

## सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रकाश जोशी यांच्याकडून

मी दिनांक ०५/०६/२०१८ रोजी मला सावंत पोलीसांनी आकले गावात रेश्मा साळुंखे यांच्या घराच्या बाजुला सुरेश कांबळे यांच्या जागेत पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्याप्रमाणे मी त्या ठिकाणी गेलो. घटनास्थळ मला अक्षता माने यांनी बोलावले होते. घटनास्थळ ही शेत जमीन आहे. पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला. आता मला पंचनामा वाचुन दाखविला. त्यावर माझी सही अनुक्रमांक १ येथे आहे. पंचनाम्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीस **निशाणी क्र.२२** देण्यात येतो.

**(साक्षीदार अभियोग पक्षास पुरक पुरावा देत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी सदर साक्षीदारास उलटतपास सदृश्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येते.)**

०२) हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनामा माझ्यासमक्ष लिहीला.

## उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. संजय भिसे यांचेकडून

०३) घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे त्याबाबतचा सातबारा मी पाहिलेला नाही. पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर मी केवळ सही

केली. पंचनाम्यावर सही करणारा मी एकटाच होतो. पंचनाम्यात काय लिहीले आहे हे मला वाचुन दाखविले नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत

SHAIKH BABASO S PATIL
Digitally signed by SHAIKH BABASO S PATIL
Date: 2023.04.05 10:53:31 +0530

महाड (**एस. एस. पाटील**)
दिनांक ०४/०४/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड